: प्रकरण 2 रे :

# कम्युनिस्ट पक्षाची इचलकरंजीतील स्थापना व पक्ष फूटीनंतर दोन्ही पक्षाची स्थापना व वाटचाल

: प्रकरण दुसरे :

# "कम्युनिस्ट पक्षाची इचलकरंजीतील स्थापना व पक्ष फूटीनंतर दोन्ही पक्षाची स्थापना व वाटचाल"

"स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज सरकारविरुद्ध कट केला म्हणून कम्युनिस्ट नेत्यांवर पेशावर, लाहोर, कानपूर असे अनेक खटले भरुन त्यांना दिर्घकाल तुरुंगात डांबण्यात आले. 1921 साली सर्व प्रथम स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यापासून ते 1946 च्या नाविक उठावापर्यंत व देशांतील संस्थानिकांविरुद्धच्या लढाईत कम्युनिस्टांचा पुढाकार होता. अरुणा असफ अली, नाना पाटील यांचा त्यात समावेश होता. थोर क्रांतीकारक चंद्रशेखर आझाद, भगतसिंग यांनी हिंदुस्थानात सोशालिस्ट रिपब्लीकन आर्मी स्थापन करुन समाजवादाचा - कम्युनिस्ट विचारांचा पुरस्कार केला."[1]

## साम्यवादी विचारांचा महाराष्ट्र प्रदेश :-

"1917 च्या रशियन क्रांतीनंतर साम्यवादी विचारांचा सर्वांगीण परिचय झाला. साम्यवादी विचारांच्या प्रभावामुळे पुढे क्रांतिकारक कामगार चळवळ आकाराला आली व त्यातूनच कम्युनिस्ट गटही अस्तित्वात आला. साम्यवादास पोषक असे वातावरण येथे पूर्वीपासून निर्माण होऊ लागले होते. मार्क्सचा जगप्रसिद्ध 'भांडवल' हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्याचवर्षी म्हणजे 1867 मध्ये विष्णुबुवा ब्रम्हचारी यांचा वेदोक्त धर्मप्रकाश हा ग्रंथ व त्याला जोडलेली च्सुखदायक राज्य प्रकरणी निबंधछ याची पंधरा कलमे प्रसिद्ध झाली. या आपल्या निबंधात त्यांनी एका आदर्श अशा समाजाचे चित्र रेखाटले आहे."[2]

**कम्युनिस्ट गटांची स्थापना :-**

चळवळ मागे घेण्याच्या बार्डोलीच्या निर्णयामुळे देशांतील क्रांतीकारी तरुणांत असंतोष पसरला. परिणामी गांधीवादी असहकाराचे आकर्षण कमी होऊन यशस्वी रशियन क्रांतीचे व तिला पोषक असे चालेले जागतिक कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या विचारसरणीचे त्यांच्या मनात मूळ धरु लागले. डांगेनी या घटनेसंबंधी केलेल्या वक्तव्यांतून देशातील एकूण क्रांतीकारक तरुणांच्या मनातील भावना स्पष्ट होतात. या मार्गाच्या तत्वचिंतनातून डांगेंचे पहिले पुस्तक 1921 च्या एप्रिल महिन्यात "गांधी विरुद्ध लेनिन" प्रकाशित झाले. या पुस्तकात डांगेनी रशियन क्रांती लेनिनचे नेतृत्व तसेच भारतीय परिस्थिती आणि गांधीवादी चळवळ यांचे मार्क्सवादी दृष्टिकोनातून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. गांधी व गांधीवादाचे मार्क्सवादी दृष्टीकोनातून मूल्यमापन करण्याचा भारतातील व महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रयत्न होता.[3]

"मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर, कानपूर इत्यादी ठिकाणी कम्युनिस्ट गट अस्तित्वात आले होते व या सर्व गटांच्या कार्याची माहिती कॉमिंटर्नला मिळत होती. अशा रितीने देशात निरनिराळया भागात कम्युनिस्ट गट अस्तित्वात आले."[4] त्या काळात जनसमुदायाच्या क्रांतीकारक आणि लोकशाही शक्तींना स्वतंत्रपणे एकत्र आणण्याचे कार्य करु शकेल अशा अवस्थेत कम्युनिस्ट पक्ष किंवा इतरही कोणता डावा पक्ष नव्हता. राष्ट्रीय भांडवलशाहीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कॉंग्रेसच्या हातीच भारताची सत्तासूत्रे राहावीत यासाठी त्यांच्याबरोबर त्यांनी तडजोड केली व देशांची सत्तासूत्रे कॉंग्रेसकडेच हस्तांतरिक केली.

## "इचलकरंजीत कम्युनिस्ट पक्ष स्थापन होण्यापूर्वीची पार्श्वभूमी"

इचलकरंजीत कम्युनिस्ट पक्ष स्थापन होण्यापूर्वी येथे मार्क्सवाद रुजण्यापूर्वी प्रारंभीची स्थिती काय होती हे पाहणे उचित ठरेल. इचलकरंजीमध्ये 1904 साली यंत्रमाग व्यवसायाची सुरुवात झाली. इचलकरंजीमध्ये पहिला हातमाग कारखाना श्री.वसंतराव दातार यांच्या वडीलांनी सुरु केला. इचलकरंजीत दिवसेंदिवस व्यवसाय वाढत गेला. या व्यवसायात अनेक लोक येत गेले आणि या यंत्रमाग व्यवसायाचे सार्वत्रिकरण झाले.

यंत्रमाग व्यवसाय स्थिर होण्यास अनेक कारणे आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणे कारणीभूत आहेत. इचलकरंजी शहराला औद्योगिक विकासामध्ये सहकार क्षेत्राचे योगदान मोलाचे लाभले आहे. विशेषत: वस्त्रोद्योगाला कवाडे उघडून देण्याचा मान या परिसराला लाभला आहे. या परिसराचे भाग्य विधाते कै.दत्ताजीराव कदम यांच्या भगिरथ प्रयत्नाने सहकार वस्त्रोद्योगाची गंगा या भागात आणली.

इचलकरंजीच्या वाढत्या उद्योगामुळे यंत्रमागधारकांचे प्रश्न निर्माण झाले. अशावेळी यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगारांचे सुद्धा अनेक प्रश्न निर्माण झाल्या. या समस्यातून अनेक अडचणी निर्माण झाल्या. शहरात मालक मजूर, मालक-पेढीवाले यांच्या वादाला तोंड फुटू लागले. साहजिकच मालक मजूरांकडून कमी हजेरीमध्ये काम करवून घेत. मजूरांच्या श्रमावर मालक ऐतआरामी जीवन जगत होते. अशा प्रश्नांवर मजूरांची बाजू घेवून त्यांना न्याय मिळवून देईल असा एकही पक्ष त्यांच्या समस्या सोडवत नव्हता. पण कम्युनिस्ट पक्ष मात्र याला अपवाद होता. मजूरांच्या प्रश्नावर जनआंदोलन उभा

करणारा तो एकमेव पक्ष हो.

शहराची आणि परिसराची ही जी औद्योगिक उभारणी झाली आहे व होत आहे ती येथील राजकारणाचा पाया आहे आणि त्या आधारेच निरनिराळे राजकीय प्रवास, पक्ष वा संघटना येथे निर्माण होणे, वाढणे, टिकणे न टिकणे यांचा विचार करावा लागत असतो. यंत्रमागाचा व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय तोही खऱ्या किंवा कृत्रिमपणे विभक्तीकरण केलेल्या विकेंद्रित लघु उद्योगाच्या कक्षेतील त्यामुळे येथील समाज जीवनात उद्योजक हा प्रमुख घटक अगदी सात-आठ वर्षाच्या मूला-मुली पासून ते सत्तर-ऐंशीच्या घरात पोहोचलेल्या म्हातारा-म्हाताऱ्यांपर्यंत सर्वजण या उद्योगात उद्योगी म्हणून गुंतलेले आहेत. त्यातील मोठी संख्या दुसरीकडे काम करणाऱ्या कामगारांची आहे आणि त्यांच्या अर्ध्या अधिक संख्येने मालक म्हणविणाऱ्यांची किंवा असणाऱ्यांची आहे. तिसरा मध्यग वर्ग या शहरात अगदीच नगण्य आहे. तसेच निव्वळ शेतकरी ही कमी आहेत आणि हे विभाग स्वत:त एवढे गुरफटलेले आहेत की, ते आपले संघटित अस्तित्व दाखवीत नाहीत मग प्रभाव पाडण्याचे लांबच राहिले. तेव्हा राजकीयदृष्टया मुख्य प्रश्न आहे तो या कामगारांचा आणि तितकाच महत्वाचा या मालकांचा.

<u>यंत्रमाग व्यवसायातील समस्या</u> :-

यंत्रमाग व्यवसायात अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या. यंत्रमाग व्यवसाय वाढू लागल्यामुळे कर्नाटक व पश्चिम महाराष्ट्रातून लोक रोजगार मिळविण्यासाठी येवू लागले. त्यामुळे शहराचा विस्तार वाढू लागला. लोकसंख्या भरमसाठ वाढली. साहजिकच अनेक नागरी प्रश्न निर्माण होवू लागले. लोकांचे आरोग्य, राहणीमान पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, दिवाबत्ती या सर्वांचा बोजा नागरी

प्रशासनांवर पडू लागला.

या सर्व समस्यांशिवाय यंत्रमाग कामगार व त्यांचे वेतनाबाबत मालक आणि मजूर समस्या निर्माण झाल्या. यंत्रमाग व्यवसायाखेरीज इचलकरंजीत अनेक व्यवसाय, उद्योग यांना चालना मिळाली. औद्योगिक शहरांच्या ज्या समस्या असतात त्या समस्या इचलकरंजीत निर्माण झाल्या.

## इचलकरंजीत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना :-

देशात आणि महाराष्ट्रात जे राजकीय बदल होत त्याचे पडसाद इचलकरंजीत उमटत आहेत. मुंबईत कामगारांचा संप झाला तर इचलकरंजीत त्याचे पडसाद उमटत. इचलकरंजीत अनेक मार्क्स लेनिन यांच्यावर निष्ठा असलेल्या लोकांनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 1952 मध्ये केली. कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करणाऱ्या पुढाऱ्यामध्ये कॉं.एस.पी.पाटील, कॉं.के.एल.मलाबादे, दत्तात्रय ठाणेकर, नेमाण्णा भोजे, पिरगोंड पाटील, बापू पाटील हे होते.

कम्युनिस्ट पक्षाची निर्मिती होण्याची अनेक कारणे आहेत. यंत्रमाग व्यवसायामुळे मजुरांची मजूरी योग्य प्रमाणात मालकाकडून न देणे, त्यांच्याकडून बळजबरीने जादा काम करवून घेणे, तसेच कामगार, कष्टकरी जनता, यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कम्युनिस्ट पक्ष उदयाला आला. मार्क्सवाद, लेनिनवाद तत्वज्ञानातून कम्युनिस्ट विचाराना चालना इचलकरंजीत मिळाली.

सुरुवातीच्या काळात यंत्रमाग धंद्यातील कामगारांचे प्रश्न ट्रेड युनियनकडे येत असतात आणि प्रश्न संपताच पक्षाकडे येत नाहीत. कारण त्यांच्यात वर्गीय जाणीव निर्माण करण्यास पक्ष कमी

पद्धत होता. कामगारांचे म्हणावे तसे राजकीय शिक्षण होत नसत. कम्युनिस्ट पक्ष कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे महत्वाचे कार्य करत होता."[5]

**कम्युनिस्ट पक्षात वैचारिक संघर्ष :-**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे विघटन वैचारिक मतभेदातून झाले. क्रांतीची दिशा त्यासाठी आवश्यक असणारी व्यूहरचना आदी ठरविण्यासाठी उपलब्ध परिस्थितीचे आकलन होणे महत्वाचे असते. या आकलनाबाबतच कम्युनिस्ट पक्षांतर्गत दोन गटांमध्ये भिन्न मते होती. त्यामुळे क्रांतीसाठी आवश्यक असणाऱ्या व्यूहरचनेविषयी या गटामध्ये स्वाभाविक स्वरुपाचे मतभेद होते.

स्वातंत्र्योत्तर भारतात भांडवलदार, जमिनदारधार्जीण्याची सत्ता होती. या पक्षाने लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता या घोषणा केल्या व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात साम्राज्यवाद, वसाहतवाद वंशवाद आदींचा निषेध केला. त्यामुळे त्यास फसवा प्रागतिक मुखवटा प्राप्त झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्षातील सदस्यांमध्ये काँग्रेसी सत्तेच्या या स्वरुपाविषयी मतभेद निर्माण झाले.

भारतामध्ये पक्ष निर्मितीस कसलाच प्रतिबंध नसल्याने येथे आपले संकुचित जातीयवादी, जमातवादी भांडवली स्वरुप प्रकट करणारे अनेक पक्ष उदयास आले. देशात जात जमातवादी शक्ती वाढत आहेत. या प्रतिगामी शक्तींच्या विरोधात काहीसा पुरोगामी असलेल्या काँग्रेस पक्षाला सहकार्य करुन आपण प्रतिगामी शक्तीचे खच्चीकरण केले पाहिजे. तर दुसऱ्या गटाचे मत असे आहे की काँग्रेसने धारण केलेला मुखवटा काहीही असला तरी त्याचे स्वरुप अन्य भांडवली आणि जात जमातवादी प्रतिगामी पक्षाहून भिन्न नाही. त्यांच्या सत्तेतील मक्तेदारीमुळे क्रांतीची मोडतोड प्रभावीपणे

तोच करु शकतो आणि म्हणून देशातील सत्तेची मक्तेदारी तोडल्यावाचून क्रांतीची प्रक्रिया होऊ शकत नाही.

देशातील व आंतरराष्ट्रीय मंचावरील निरनिराळया घटनांच्या पार्श्वभूमीत पक्षांतर्गत दोन गटातील या मुद्यावरील मतभेद वाढत गेले व त्यातून 1964 मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे विघटन होऊन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष अशा दोन पक्षांची निर्मिती झाली.[6]

## इचलकरंजीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना :-

"सध्याच्या भांडवलदारी-जमिनदारी शासन संस्थेच्या जागी जनतेच्या लोकशाहीची नवी शासन संस्था प्रस्थापित करणे हे भा.क.प.(मार्क्सवादी ) चे मुख्य उद्दिष्ट आहे. समाज सत्तावादी निर्माण करणे. मार्क्स, लेनिनचे विचार जनतेत रुजावेत म्हणून इचलकरंजीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 1964 साली झाली. कॉ.एस.पी.पाटील, कॉ.के.एल.मलाबादे, दत्तात्रय ठाणेकर, नेमाण्णा भोजे इत्यादी नेते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या निर्मितीच्या (स्थापनेच्या) वेळी होते. सध्या या पक्षात 183 सदस्य आहेत.

## पक्ष बांधणीचे कार्य :-

पक्षाच्या कार्याचा विस्तार वाढविण्यासाठी जनआंदोलने उभारणे, पक्षाची भूमिका पक्ष सभासद व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी अभ्यास वर्ग, शिबीरे घेणे. पक्ष सभासदांना राजकीय शिक्षण देणे, पक्षाची स्वतंत्र ताकद वाढविणे इत्यादी निर्णय घेवून कार्यवाही करण्यात आली.

जेव्हा इचलकरंजीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली तेव्हा काँग्रेस हा प्रभावी पक्ष म्हणून कार्य करीत होता. त्या पक्षाचा प्रचंड विरोध मा.क.प.ला झाला. काँग्रेस हा इचलकरंजीतील भांडवलदार, श्रीमंत, जमिनदार यांचा पाठीराखा होता. साहजिकच मा.क.प.च्या उदयाने श्रीमंत लोकांच्या हितसंबंधाना धोका होता. कारण मार्क्सवादाचे तत्वज्ञान विकसित होता कामा नये. कामगार वर्गात वर्गीय जाणीव विकसित झाली तर आपल अस्तित्व धोक्यात येणार या समजूतीने वैचारिक व अन्य मार्गाने विरोध करत होता. मार्क्सवादी पक्षाची विचारसरणी जनतेपर्यंत पोहचता कामा नये. यासाठी हा पक्ष प्रयत्न करीत होता. हिंदुत्ववादी संघटनांचा प्रभाव म्हणावा एवढा नव्हता. आर.एस.एस., जनसंघाच्या शाखा मर्यादित होत्या. सध्या इचलकरंजीच्या राजकारणत भाजप, शिवसेना, जद आणि भा.क.प., मा.क.प. हे पक्ष अस्तित्वात आहेत. पण मार्क्सवादी पक्षाचा ताकद सभासद संख्या यात प्रचंड वाद झाल्यामुळे सध्या विरोधाची तीव्रता कमी आहे.

सुरुवातीच्या काळात कामगार सामान्य नागरिक दोलायमान स्थितीत होता. काँग्रेसचा प्रभाव मोठा होता. त्यामुळे त्या प्रभावामुळे कामगार, शेतकरी मार्क्सवादी पक्षाकडे येण्याचे धाडस करत नव्हता.

**<u>इचलकरंजीतील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची रचना</u> :-**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची शहर कमिटी असते. पक्ष सदस्य असतात. शहर कमिटी शहराला मार्गदर्शन करते ; कार्यकर्त्यांना शहर कमिटी मार्गदर्शन करते. ज्या प्रमाणे राज्य पातळीवर संघटनात्मक बांधणी असते. तशीच रचना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची आहे. पक्षाचा शहर

सेक्रेटरी हा प्रमुख असतो. त्याबरोबर खजिनदार ही पदे असतात.

**पक्षशिक्षण :-**

इचलकरंजीतील मार्क्सवादी पक्षातील सदस्य यांना राजकीय शिक्षण देण्यासाठी वर्षातून अभ्यास वर्ग घेण्यात येतात. शाखावार शहरात शिबीरे आयोजित केली जातात. या शिबीरात भा.क.प. च्या सदस्य पक्षाची आवश्यकता का आहे. संघटनेची आवश्यकता कशी आहे. एखादी व्यक्ती एखादे काम पूर्ण करु शकत नाही ते काम संघटना करु शकते म्हणून कामगारांच्या संघटनेची आवश्यकता सांगून त्यांना वर्गीय जाणीव करुन देणे.

कम्युनिस्ट पक्षामध्ये इतर राजकीय पक्षांप्रमाणे सभासद होता येत नाही. एखादी व्यक्ती सभासद होणार असेल तर त्या व्यक्तीला उमेदवारी करावी लागते आणि त्यानंतर शहर संघटना त्याला सभासद करुन घेते.

पक्ष सभासदांत सहायक सभासद, उमेदवार सभासद पूर्ण सभासद असे तीन प्रकार असतात.

दोन पक्ष सभासदांच्या शिफारशींवरुन व्यक्तीगत अर्जावरुन नवे सभासद दाखल केले जातात. पक्षा प्रवेशाच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत अर्जदाराला सहायक सभासद मानले जाते. त्याची योग्यता लक्षात घेवून दुसऱ्या वर्षी त्याला उमेदवार सभासद केले जाते. त्यांची मुदत संपण्याच्या सुमारास संबंधित पक्ष शाखेत उमेदवार सभासद पूर्ण सभासद म्हणून प्रवेश देण्यास पात्र झाला किंवा नाही यावर

चर्चा केली जाते व पात्र असल्यास त्यास पूर्ण सभासद केले जाते. सहायक व उमेदवार सभासदांना पक्षाचे धोरण, कार्यक्रम, घटना, मार्क्सवाद, लेनिनवाद याबाबतचे प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था संबंधित पक्ष शाखा करते.

पक्षात दाखल होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पक्ष-प्रतिज्ञेवर सही करावी लागते. तसेच दरवर्षी सर्व पक्ष सभासदांना नूतनीकरणाच्या वेळी वार्षिक वर्गणी व पक्षाची मध्यवर्ती कमिटी ठरवील त्याप्रमाणे मासिक लेव्ही भरावी लागते.

**पक्षशिस्त :-**

कोणत्याही राजकीय पक्षात विशेषता क्रांतीकारी पक्षात शिस्तीचे महत्व अनन्यसाधारण असते. पक्षशिस्तीचा कडकपणे अंगिकार केल्याशिवाय पक्षाला जनतेच्या लढयांचे नेतृत्व करता येणार नाही. म्हणून मा.क.प. ने सर्व पक्ष सभासदांना पक्षशिस्तीचे बंधन सारखेच घातले आहे. पक्ष घटनेच्या व निर्णयाचा भंग त्याचप्रमाणे कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदाला न शोभणारी कृत्ये व वर्तणूक ही पक्षशिस्त समजली जावून शिस्तभंगाच्या कारवाईला पात्र ठरतात.

**पक्ष निधी :-**

पक्ष कार्यासाठी पैशांची आवश्यकता असतेच. हा पैसा पुढील प्रमाणे जमा होते.

1) पक्ष सभासदांकडून जमा होणारी वर्गणी.

2) पक्ष सभासदांकडून जमा होणारी लेव्ही

3) संसद व विधिमंडळे यातील सभासदांना मिळवणाऱ्या मानधनातील रक्कम.

4) पक्ष सहानुभूतीदार व जनतेकडून वेळोवेळी जमा केलेल्या देणग्या

5) निवडणूकीच्या काळात जनतेकडून जमा झालेला निधी.

6) पक्ष सभासदांनी पक्षाला दिलेल्या देणग्या.

<u>जनसंघटना</u> :-

समाजातील विविध स्तरांमध्ये पक्षाची विचारसरणी रुजावी व प्रभाव वाढावा म्हणून कम्युनिस्ट पक्ष विविध संलग्न जनसंघटनामार्फत कार्य करतो. या जनसंघटनांच्या कार्यातूनच पक्ष जनतेला क्रांतीप्रवण बनविण्याचे कार्य करीत असतो. इचलकरंजीमध्ये कार्यरत असलेल्या जनसंघटना पुढीलप्रमाणे.

1) ट्रेड युनियन (सिटूला संलग्न)

2) किसान सभा

3) शेतमजूर युनियन

4) स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया

5) डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया

6) जनवादी महिला संघटना

या संघटना मा.क.प. ने विभाजनानंतर पक्षाची विचारसरणी जनतेत रुजावी यासाठी निर्माण केल्या. या संघटना इचलकरंजीमध्ये आपली कार्ये पार पाडताना दिसतात.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची वाटचाल :-

इचलकरंजीमध्ये मा.क.प.ने इचलकरंजीतील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न, आंदोलने केली. या पक्षाने प्रारंभी यंत्रमागधारकाच्या समस्या घेवून आपल्या राजकीय कार्याला सुरुवात केली. इचलकरंजी शहराचे नागरी प्रश्न येथील यंत्रमाग व्यवसाय धोक्यात येवू नये म्हणून संघर्ष केला. कामगार,शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक, विद्यार्थी यांच्या समस्या प्रभावीपणे व समर्थपणे मांडून जनतेचे प्रबोधन, त्या प्रश्नांबाबत जागृती करण्याचे कार्य मा.क.प.ने केले.

ट्रेड युनियनच्या माध्यमातून कामगाराचे कामाचे तास, बोनस, प्र.फंड, ग्रॅच्युटी मिळवून देण्यासाठी जनआंदोलने भा.क.प. ने केली. महागाई विरोधी सतत संघर्ष, कामगारांचे राहणीमान, शहराचे आरोग्य, घरभाडे, झोपडपट्टी, सामाजिक सुधारणा याबाबत मा.क.प.ने सतत संघर्षाची भूमिका घेवून ते प्रश्न सोडविण्यास मदत केली.

अशा रितीने मा.क.प.ने सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांची सोडवणूक करुन एक प्रभावी राजकीय पक्ष निर्माण करुन इचलकरंजीच्या राजकारणात वाटचाल करत आहे.

## इचलकरंजीत भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना :-

"सामाजिक श्रमासाठी उत्पादन साधनांची गरज असते. समाजाच्या छोटया गटाने उत्पादन साधनावर मालकी हक्क मिळवला. उत्पादन साधनावर मालकी गाजवून श्रम न करता उत्पादनाची लूट करणारा, समाजाच्या गरजा भागवणारा कष्टकरी वर्ग यामध्ये वर्ग संघर्ष निर्माण झाला. कामगारांचे अनेक प्रश्न निर्माण झाले. मार्क्स व एंजल्स यांनी हे विचार शास्त्रीय पद्धतीने मांडले. मार्क्सवादी तत्वज्ञान आकारले. हे तत्वज्ञान हा भारतीय कम्युनिस्ट पक्षांच्या विचारांचा पाया आहे."[8]

इचलकरंजीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 1982 च्या शेवटी झाली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे इचलकरंजी शहर सेक्रेटरी कॉ.हणमंत लोहार आहेत. सध्या नऊ लोकांची कार्यकारणी आहे. ती पुढीलप्रमाणे मारुती आजगेकर, शंकर आढावकर, आप्पासो पाटील, फूलाजी लोखंडे, आंबूबाई शेळके, दिनकर थोरात, मालूताई पंढरपूरे असे नऊ सदस्य कार्यकारणीत आहेत. सध्या 1998-99 मध्ये पक्ष सदस्य 30 आहेत.

## पक्षबांधणीचे कार्य :-

लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांना अनन्य साधारण महत्त्व असते. प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या पक्षाची ध्येयधोरणे, विचारप्रणाली लोकांमध्ये पसरवीत असतो आणि त्या ध्येयधोरणांना जनतेचा पाठिंबा मिळावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत असतो. आपली धोरणे इतर राजकीय पक्षापेक्षा कशी योग्य आहेत. लोकाभिमुख आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न करत असतो. कारण प्रत्येक राजकीय पक्षांचा उद्देश्य हा राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न असतो. आणि त्यासाठी लोकांची संमत्ती व

लोक इच्छा आवश्यक असतात. म्हणून प्रत्येक राजकीय पक्ष योजनाबद्ध पक्ष बांधणी, संघटन करतो आणि कार्यकर्त्यांचा संच तयार करतो.

1964 च्या कम्युनिस्ट पक्षांच्या फूटीनंतर बाळनाथ वरुटे, विष्णू सुर्यवंशी, अरविंद करनूरे यांनी विशेष प्रयत्न केले. इचलकरंजीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाची बांधणी चांगल्या प्रकारे करुन सर्वसामान्य लोकांचे प्रश्न, समस्या, यंत्रमाग कामगारांचे प्रश्न, झोपडपट्टीचे प्रश्न, महागाईचा प्रश्न अशा प्रश्नांवर प्रथम संघर्ष, मोर्चे, आंदोलने केली आणि त्यानंतर पक्ष बांधणीचे कार्य हाती घेतले. भारतीय कम्युनिस्ट पक्षांची स्थापना 1982 मध्ये झाली. 1964 ते 1982 या मध्यंतरीच्या काळात जनतेच्या समस्याना वाचा फोडली.

"भारतीय कम्युनिस्ट पक्ष निर्माण झाला तेंव्हा त्याच्याबद्दल लोकांच्यामध्ये सहानुभूती निर्माण झाली. हा पक्ष लोकांच्यामध्ये विश्वासाचे स्थान निर्माण करु शकला कारण लोकांची कामे करणारा पक्ष म्हणून इचलकरंजीत ख्याती झाली होती. इचलकरंजीमध्ये अनेक राजकीय पक्ष होते. त्यामध्ये काँग्रेस, मा.क.प., जद, शिवसेना, भाजप हे होत. या पक्षांच्या बरोबर वैचारिक संघर्ष निर्माण झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष लोकांच्यामध्ये रुजतो की काय अशी अवस्था निर्माण झाली."[1]

## इचलकरंजीतील भारतीय कम्युनिस्ट पक्षाची रचना :-

भा.क.पक्षाची रचना ही राज्य स्तरांवर जशी रचना असते. तशीच रचना जिल्हा व शहर पातळीवर असते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाला एक शहर सेक्रेटरी असतो व एक खजिनदार असतो आणि त्याला सहाय्य करण्यासाठी शहर कार्यकारणी असते. सध्या नऊजणांची शहर कार्यकारणी आहे. शहर

सेक्रेटरी हा शहर शाखेचा प्रमुख असतो. त्याच्या आदेशानुसार शहर पातळीवर निर्णय व पक्षाचे कार्य चालते.

**पक्षशिक्षण :-**

इचलकरंजीत भारतीय कम्युनिस्ट पक्षातील सभासदांना पक्षाची ध्येयधोरणे, विचारप्रणाली यांची माहिती व्हावी. मार्क्सवाद, लेनिनवाद म्हणजे कार्य? देशात सनदशीर मार्गाने समाजसत्ता सरकार स्थापन कसे करता येईल? वर्गीय जाणीव पक्ष सदस्यांमध्ये निर्माण व्हावी यासाठी शहर पातळीपासून राज्य, देश पातळीपर्यंत अभ्यास वर्ग पक्ष कार्यकर्त्यांसाठी आयोजित केले जातात.

पक्षाच्या इचलकरंजीमध्ये प्रत्येक शाखावार मिटींग, शिबीर आयोजित करणे हे शिबीर तीन, दोन, एक दिवसाचे असते. यातून लढाऊ व क्रांतीकारी विचारांचा कार्यकर्ता तयार केला जातो.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्यत्व स्विकारताना पक्षाच्या सदस्यांला अनेक निकष पार पाडावे लागतात. पक्षाचे सदस्यत्व करुन घेतेवेळी हे निकष लावले जातात. मार्क्सवाद लेनिनवाद, वर्गीय जाणीव, पक्षांचे राजकीय तत्वज्ञान मान्य असलेल्या व्यक्तीला सभासद करुन घेतले जाते. सभासद झालेली व्यक्ती पक्षांच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होते. वेळोवेळी ती पक्ष मिटींगांना हजर असते. पक्षाचे वर्षभर काम असते. यात सहभागी झालेल्या व्यक्तीची सभासद होण्यास शिफारस केली जाते. इतर राजकीय पक्षांमध्ये राजकीय पक्षांचे सभासद सहजासहजी होता येते. पण कम्युनिस्ट पक्षांचे सभासद सहजासहजी होता येत नाही.

**पक्षशिस्त :-**

कोणत्याही राजकीय पक्षांमध्ये पक्ष शिस्त महत्त्वाची असते. पक्षशिस्तीमुळे पक्ष कार्यकर्त्यामध्ये पक्षाचे धोरण योग्यरितीने राबविण्याचा प्रयत्न केला जातो. भारतीय कम्युनिस्ट पक्षामध्ये वेचक कार्यकर्ते घेतले जातात. त्यांच्यात पक्षशिस्त निर्माण केली जाते.

भारतीय कम्युनिस्ट पक्षातील सदस्य पक्ष विरोधी वर्तन केल्यास त्या सदस्यांवर कठोर कारवाई केली जाते. इतर भांडवली पक्षांपेक्षा भाकपची पक्षशिस्त कठोर आहे.

**पक्षनिधी :-**

पक्ष कार्यासाठी पैशाची आवश्यकता असते. पुढील मार्गाने पक्ष निधी उभा केला जातो.

पक्ष सभासदांकडून जमा होणारी वार्षिक वर्गणी. पक्षाचे सहानुभूतीदार व जनतेकडून वेळोवेळी जमा केलेल्या देणग्या आणि निवडणूक काळात जनतेकडून जमा झालेला निधी, पक्ष सभासदांनी पक्षाला दिलेल्या देणग्या यातून पक्ष निधी उभा केला जातो.

**जनसंघटना : -**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पुढील जनसंघटना निर्माण केल्या आहेत. त्या जनसंघ निर्माण करुन पक्ष कार्यक्रम, धोरण जनतेत रुजविण्याचा प्रयत्न केला.

1. करवीर कामगार संघ

2. ग्रामपंचायत संघटना

3. अंगणवाडी बालवाडी संघटना

4. विद्यार्थी संघटना

5. शेतकरी, शेतमजूर संघटना

अशा सहाय्यकारी संघटना तयार करुन त्यांच्यापासून वेचक कार्यकर्त्यांना पक्ष कार्यासाठी निवडले जाते."[9]

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाची वाटचाल :-

मार्क्सवादी पक्षाच्या वैचारिक संघर्षापासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आजपर्यंत राजकीय प्रवास केला आहे. इचलकरंजी शहरातील आर्थिक, सामाजिक व राजकीय संघर्षामध्ये महत्त्वाची भूमिका वटविली आहे.

आर्थिक लढयामध्ये यंत्रमाग कामगार, शेतकरी, शेतमजूर यांचे वेतन संबंधी, मजूरीसंबंधीचे लढे उभा केले. सर्व सामान्य कामगारांचा राहणीमानाचा दर्जा सुधारावा, त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी आणि त्यांच्या त वर्गीय जाणीव निर्माण करुन समाजसत्तावादी क्रांती यशस्वी व्हावी यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने प्रयत्न केले.

सामाजिक प्रबोधनामध्ये देवदासी, हुंडाविरोधी चळवळ व व्याख्यांनाद्वारे सामाजिक

13781
A

प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. इचलकरंजीमध्ये भा.क.प. शहर शाखेमार्फत लहान मुलांसाठी बालवाडी अंगणवाडी चालविण्याचा प्रयोग करण्यात आला आहे. अशा प्रकारे कोणत्याही मांडवली विचार असणाऱ्या पक्षात असा शैक्षणिक उपक्रमाचा प्रयोग राबविला जात नाही.

सर्वसामान्य लोकांच्या, कामगारांच्या दैनंदिन प्रश्नावर आंदोलन करणारा पक्ष म्हणून कामगार वर्गात भारतीय कम्युनिस्ट पक्ष महत्वाचे स्थान निर्माण करु शकला आहे. महिलांच्यावर अन्याय झाल्यास किंवा त्यांच्या प्रश्नावर भा.क.प. कार्य करतो आहे. म्हणून पक्षाचे कार्य पाहून लोक भा.क.प.कडे आकर्षिले जात आहेत.

इचलकरंजीमध्ये 1952 साली स्थापन झालेल्या कम्युनिस्ट पक्षाला आपले प्रभावक्षेत्र निर्माण करण्यास बराच कालावधी लागला. इचलकरंजीत यंत्रमाग कामगाराचे प्रश्न घेवून त्यांच्यात वर्गीय भावना वाढीस लावणे व मार्क्सवादाचे तत्वज्ञान निर्माण करण्यास वेळ लागला. कम्युनिस्ट पक्षाचे प्रभावक्षेत्र वाढू लागलेल्या काळात 1964 ला वैचारिक संघर्षामुळे पक्षाचे विभाजन झाले. मा. क. प. व भा. क. प. असे दोन पख अस्तित्वात आले.

मा. क. प. ला प्रभावी नेतृत्त्व लाभल्याने इचलकरंजीत पक्ष स्थिर होवू लागला. भा. क. प. ची पक्ष बांधणी व संघटनात्मक कार्य स्थिर होऊ शकले नाही. म्हणून दोन्ही पक्षांना आपले प्रभावक्षेत्र निर्माण असेल तर कामगारांच्या प्रश्नांबरोबर सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

## : संदर्भ :


1) भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र राज्य कौन्सिल

2) डॉ.मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्यु.पक्ष, कैलाश पब्लीकेशन, मार्च 1995, पा.नं.16

3) रणदिवे बाबुराव , कॉम्रेड डांगे , अभिनव प्रकाशन, मुंबई, पा. नं. 31

4) डॉ.मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्स.कम्यु.पक्ष., कैलाश पब्लिकेशन्स, मार्च 1995, पा. नं. 30

5) कॉ.दत्ता माने , मुलाखत , मा.क.प.

6) डॉ. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्स, कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, पा. नं. 68

7) कॉ.दत्ता माने , मुलाखत, मा. क. प.

8) भारतीय कम्युनिस्ट पक्ष , राजकीय ठराव, प्रकाशक गोविंद पानसरे, राजभुवन, मुंबई, पा. नं. 15

9) कॉ.हणमंत लोहार , मुलाखत , भारतीय कम्यु. पक्ष.


****